**MHKO100007182013**

–

## रे.क.नं. २००/२०१३ मधील निशाणी क्र.८३ वरील आदेश
## (वसंत कुरळे वि. सिदगोंडा पाटील)

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील हे दिनांक १६/०६/२०२५ रोजी मयत झाले आहेत. वादी यांचे वडील वयस्कर असून त्यांना पॅरालिसिसचा आजार असल्याने त्यांना हिंडता फिरता येत नाही. त्यांच्या सेवेसाठी त्यांना घरीचे थांबावे लागते. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी टाळाटाळ केलेली नाही. वारसांना मुदतीत रेकॉर्डवर आणावे लागते याचे ज्ञान नव्हते. सबब प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून वारस रेकॉर्डवर घेणेची विनंती केली आहे.

**२.**　　प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जातील मजकूर धांदात खोटा आहे.  वादीना प्रतिवादी यांना हेतूपुरस्कर त्रास देण्याचा आहे. सदरचा अर्ज विलंबाने दिला आहे. प्रतिवादी यांना याकामी प्रत्येकी कॉस्ट रू.५०००/- मिळावी.

**३.**　　वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**४.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन मनाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यांनी निशाणी ८१ चे वर्णन यादीसोबत प्रतिवादी क्र.२ यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील हे दिनांक १६/०६/२०२५ रोजी मयत झाल्याचे अभिलेखावर दाखल मृत्यू प्रमाणपत्रावरून दिसून येते. प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यास दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादी यांनी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

प्रतिवादी यांना रक्कम रुपये ४००/- (अक्षरी रुपये चारशे मात्र) खर्चादाखल देणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.12.01 17:28:50 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०१/१२/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज